(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या निर्णयाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

<u>वनजमिन-ठाणे</u>

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता (अभियांत्रिकी विभाग), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (मुंबई ते पुणे) ते कटाई जंक्शन दरम्यान जोडरस्ता बांधण्याकरीता मौजे-देसाई, ता. व जि. ठाणे येथील ०.८३२५ हेक्टर कांदळवनक्षेत्र वळतेकरणाबाबत.

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-१२१८/प्र.क्र.१९५/फ-१०

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: ३०/०७/२०१८

**<u>प्रस्तावना :-</u>**

कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र) ४.मुंबई ते पुणे (ते कटाई जंक्शन दरम्यान जोडरस्ता बांधण्याकरीता मौजे-देसाई, ता .व जि .ठाणे येथील एकूण ०.८३२५ हेक्टर कांदळवनक्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या वन विभागास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती प्रस्तावास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे आदेश क्रमांक एफ.नं.११-९/९८-एफसी, दिनांक १३/०२/२०१४ व दिनांक २१/०८/२०१४ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, राष्ट्रीय महामार्ग क्र) ४.मुंबई ते पुणे (ते कटाई जंक्शन दरम्यान जोडरस्ता बांधण्याकरीता मौजे-देसाई, ता .व जि .ठाणे येथील एकूण ०.८३२५ हेक्टर कांदळवनक्षेत्र वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/२/आयडी-१२६१६/(६३)/५००/२०१८-१९, दिनांक ०४/०६/२०१८ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास **<u>तत्त्वत: मंजूरी</u>** देत आहे. वनजमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| गावाचे नाव, तालुका व जिल्हा | सर्व्हे नंबर | | वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|
| | जुना सर्व्हे नंबर | नवीन सर्व्हे नंबर | | |
| मौजे-देसाई तालुका-ठाणे, जिल्हा-ठाणे | १७४ | १७४pt | ०.०२३४ | संरक्षित वने म्हणून अधिसूचित न झालेले कांदळवनक्षेत्र |
| | २३५ | २३५ pt | ०.१७८२ | |
| | २२३ pt | २२३ pt | ०.०९२८ | |
| | १८० | १८० pt | ०.१३४० | |
| | ७४ | ७४ pt | ०.०६२६ | |
| | ७५ | ७५ pt | ०.०११५ | |
| | ९० | ९० pt | ०.०५५० | |
| | ९१ | ९१ pt | ०.२७५० | |
| **एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये)** | | | **०.८३२५** | **कांदळवन** |

२. <u>**सदर तत्वत: मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-**</u>

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) वन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या १.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर प्रकल्प यंत्रणेस स्व:खर्चाने पर्यायी वनीकरण करावे लागेल.

३) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

४) भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रकल्प यंत्रणेस ०.८३२५ हेक्टर वनक्षेत्राकरीता अनुज्ञेय नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

५) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार/ सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरावी लागेल.

६) जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन कांदळवन क्षेत्रात काम सुरु करण्यापूर्वी मा.उच्च न्यायालय/ मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

७) आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाव्दारे पर्यावरणीय मंजूरी (Environmental Clearance) प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

८) आवश्यक असल्यास सक्षम प्राधिकरणाव्दारे सागरी किनारा नियमन क्षेत्र अधिसूचना अंतर्गत (Coastal Regulation Zone Notification) परवानगी प्राप्त करुन घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

९) प्रकल्प यंत्रणेस एकूण ०७ वृक्षांच्या तोडीसाठी अनुज्ञेय असणारी रक्कम अदा करणे बंधनकारक राहील. प्रकल्पाकरीता आवश्यक व कमीत कमी वृक्षांची तोड करण्यात यावी. टाळता येण्याजोगी वृक्षतोड टाळावी व अशा वृक्षांची पूर्व नियोजित जागेवर पुन:लागवड करणेसाठीचे सर्वतोपरी प्रयत्न प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाव्दारे करण्यात यावेत.

१०) प्रस्तावित प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक असणा-या साधनसामुग्रीची ने-आण करणेसाठी वनक्षेत्रात कोणताही अतिरिक्त/ नवीन रस्ता तयार करण्यात येऊ नये.

११) प्रस्तुत रस्त्याचा वापर करण्या-या वन विभागाच्या सर्व वाहनांना पथकर आकारणीतून सूट देण्यात यावी.

१२) प्रकल्पाकरीता वळती करण्यात आलेल्या क्षेत्रावरील हरीत आच्छादनाच्या संतुलनासाठी २० स्थानिक वन प्रजातींची लागवड व त्यांचे संवर्धन प्रकल्प यंत्रणा स्वखर्चाने करेल. वृक्ष लागवडीकरीता आवश्यक स्थळ वन विभागाव्दारे (उपवनसंरक्षक, ठाणे) प्रकल्प क्षेत्रात किंवा प्रकल्पाच्या आसपासच्या परिसरात निवडले जाईल.

१३) प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे ज्या पक्ष्यांचे अधिवास/ घरटे नष्ट होणार आहेत त्या पक्ष्यांच्या अधिवासाची पर्यायी व्यवस्था व भविष्यातील देखभाल राज्य शासनाच्या सल्ल्यानुसार प्रकल्प यंत्रणेस करणे बंधनकारक राहील. प्रस्तावित वनक्षेत्र व वनक्षेत्राच्या आसपासचा परिसर तसेच मानवी वसाहतींचा परिसरात पर्यावरण पूरक साहित्याचा वापर करुन तयार केलेली घरटी उभारण्यात यावीत.

१४) प्रस्तुत रस्त्याच्या अद्ययावतीकरणासाठी अतिरिक्त वनक्षेत्राची कोणतीही मागणी पुढील ५ वर्षात मंजूर करता येणार नाही.

१५) प्रकल्प यंत्रणेने उक्त प्रकल्पास लागू असण्या-या सर्व संबंधित कायद्यांतील तरतुदी, नियम व मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असेल.

१६) उपरोक्त नमूद केंद्र शासनाच्या पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून ही तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

१७) वन विभागाने घातलेल्या सर्व अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

१८) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे परवानगीशिवाय प्रस्तावित वनजमिनीवर काम सुरुवात करण्यात येऊ नये.

१९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

२०) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमिन वळतीकरणास अंतिम मंजूरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०७३०१३३२५५२७१९ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.07.30 13:42:33 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत,**

१. सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
८. विभागीय आयुक्त, कोकण.
९. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
१०. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.
११. जिल्हाधिकारी, ठाणे.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
१३. उपवनसंरक्षक, ठाणे.
१४. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
१५. कार्यकारी अभियंता (अभियांत्रिकी विभाग), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई.
१६. निवडनस्ती (फ-१० कार्यासन).

२. जिल्हाधिकारी, ठाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे व उपवनसंरक्षक, ठाणे यांना निर्देशित करण्यात येते की, वरील निर्णयाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील निर्णय त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि महाराष्ट्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे व उप वनसंरक्षक, ठाणे यांना सादर करण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

**Forest Land- Thane**

Diversion of 0.8325 Ha. of Mangrove land not notified as Protected Forest under Forest (Conservation) Act, 1980 in favour of Executive Engineer (Engineering Division), Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai for construction of Link Road from NH-4 (Mumbai-Pune Road) to Katai Junction in Village Desai, Tal.& Dist.Thane.

# Government of Maharashtra

## Revenue and Forest Department

## Government Resolution No.: FLD-1218/CR-195/F-10

Mantralaya, Mumbai-400032

Date: 30/07/2018

**Preamble:-**

Executive Engineer, Engineering Division, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai has submitted a proposal for diversion of 0.8325 Ha. of Mangrove land not notified as Protected Forest under Forest (Conservation) Act, 1980 for construction of Link Road from NH-4 (Mumbai-Pune Road) to Katai Junction in Village Desai, Tal.& Dist.Thane, to the State Forest Department. After careful scrutiny of the proposal, granting of in-principle approval to the aforesaid project is under consideration of the State Government.

**Resolution:-**

In exercise of powers delegated to the State Government, vide Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi's order F.No.11-9/98-FC, dated 13/02/2014 and dated 21/08/2014, Government of Maharashtra is pleased to grant **in-principle approval** to the diversion of 0.8325 Ha. Mangrove land not notified as Protected Forest under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980, as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, vide his letter no. Desk-17/NC/II/I.D.-12616/(63)/500/2018-19, dated 04/06/2018 for construction of Link Road from NH-4 (Mumbai-Pune Road) to Katai Junction in Village Desai, Tal.& Dist.Thane. The details are as follows:-

| Village Name, Taluka & District | Survey Number | | Forest Area (in Ha.) | Legal Status |
|---|---|---|---|---|
| | Old Survey Number | New Survey Number | | |
| Village-Desai<br><br>Taluka-Thane, District- Thane | 174 | 174pt | 0.0234 | Mangrove Land not notified as Protected Forest |
| | 235 | 235 pt | 0.1782 | |
| | 223 pt | 223 pt | 0.0928 | |
| | 180 | 180 pt | 0.1340 | |
| | 74 | 74 pt | 0.0626 | |
| | 75 | 75 pt | 0.0115 | |
| | 90 | 90 pt | 0.0550 | |
| | 91 | 91 pt | 0.2750 | |
| **Total Forest Area (in Ha.)** | | | **0.8325** | Mangrove |

2. **<u>This in-principle approval is issued subject to the following conditions:-</u>**

1) The legal status of the land will remain unchanged.
2) Compensatory Afforestation will be raised at the cost of the User Agency on 1.00 Ha. degraded forest land made available by the Forest Department.
3) The Forest land shall not be used for any purpose other than specified in the project.
4) The User Agency will defray the cost of Net Present Value of 0.8325 Ha. of Forest Land as per latest guidelines of Government of India.
5) The User Agency will defray the additional/ revised cost of Net Present Value as per latest guidelines of Government of India.
6) Permission of Hon'ble High Court, Bombay/ National Green Tribunal shall be obtained for implementing the project in Mangrove areas as per Bombay High Court order, dated 27/01/2010 in PIL No.87/2006.
7) The User Agency will obtain the Environmental Clearance from competent authority, if required.
8) The User Agency shall obtain permission from Competent Authority under CRZ Notification, if required.
9) The User Agency will defray the cost of removal of 07 trees in the area. However, only the required and minimum number of trees will be felled. In situations where felling of trees is avoidable and such trees could be transplanted, all efforts to transplant such trees at a pre designated site will be taken and additional expenditure, if any, in such cases shall be at the cost of the User Agency.
10) No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for the execution of the project work.
11) All Vehicles of Forest Department will not be charged Toll Tax while using this road.
12) The User Agency shall plant and maintain 20 indigenous forest tree species on the diverted forest land to maintain the green cover at the cost of Project Agency. Plantation site for the purpose will be identified by the State Forest Department i.e Deputy Conservator of Forests, Thane (Preferably within or in the surrounding area of the project).

13) The User Agency in consultation with the State Government shall create and maintain an alternate Habitat/ Home for the avifauna, whoose nesting tress are to be cleared in this project. Bird's nest artificially made out of eco-friendly material shall be used in the area, including forest area and human settlements, adjoining the forest area being diverted for the project.
14) Additional diversion of Forest Land for extension/ strengthening of such road shall not be permitted within next five years.
15) Provision of all relevant Acts, Rules made there under and guidelines applicable to the project shall have to be strictly followed.
16) This in-principle approval is also subject to the terms and conditions mentioned in the Government of India’s letter referred to here-in-above is binding on User Agency.
17) All the conditions stipulated by the Forest Department shall be binding on the User Agency.
18) No work should be started on the proposed forest land without prior permission of the Chief Conservator of Forests (T.), Thane.
19) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.
20) The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T), Thane.

3. This Government Resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201807301332552719. This Resolution has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.07.30 13:45:18 +05'30'

**( Virendra Tiwari )**
**Chief Conservator of Forests (Mantralaya)**

**Copy forwarded to:**

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central zone, Government of India, Nagpur.
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur.
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.

5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Mangrove Cell), Mumbai.
8. Commissioner, Kokan Division.
9. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
10. Chief Conservator of Forests (T), Thane.
11. Collector, Thane.
12. Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane.
13. Deputy Conservator of Forests, Thane.
14. Divisional Forest Officer, Mumbai Mangrove Conservation Unit, Mumbai.
15. Executive Engineer, Engineering Division, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai.
16. Select File-F-10.

2. Collector, Thane, Chief Executive Officer, Zilla Parishad, Thane and Deputy Conservator of Forests, Thane are hereby directed to forward the copy of this Resolution to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this Resolution on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. Executive Engineer, Engineering Division, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai is hereby directed that he should publish the entire resolution of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No.etc. and along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial), Thane & Deputy Conservator of Forests, Thane.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.